ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ३ जून, १९५९ | अंक २२

## विविध माहिती

**शिक्षणावरील खर्चांत वाढ करा**—प्रेसिडेंट आयसेनहोअर ह्यांना शास्त्रीय ज्ञानाविषयीं सल्ला देणारी एक कमिटी आहे. ह्या कमिटीनें अशी शिफारस केली आहे कीं, अमेरिकेंतील शास्त्रीय ज्ञानाच्या शिक्षणावर करण्यांत येणाऱ्या खर्चांत दुप्पट वाढ करण्यांत यावी. शास्त्रीय विषयांच्या शिक्षणावर दरसाल ३,७०० कोटी डॉलर्स खर्च करण्यांत यावेत असें कमिटीचें मत आहे.

**आंध्र राज्यांतील प्राथमिक शिक्षण**—आंध्र प्रदेश सरकारनें १ जुलै, १९५९ पासून राज्यांत १,००० नव्या प्राथमिक शाळा उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या शाळा फक्त एकाच शिक्षकाच्या साह्यानें चालविल्या जातील. चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांत ह्या योजनेसाठी २४ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्यांपैकीं १९ लाखांवर रक्कम यंदा खर्च करण्यास मंजुरी देण्यांत आली आहे.

**कच्च्या फिलमचें उत्पादन**—भारताचे उद्योगमंत्रि सध्यां रशिआच्या दौऱ्यावर आहेत. परंतु येतांना ते जपानला भेट देणार आहेत. जपानमधील कारखानदारांच्या साह्यानें कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना भारतांत काढण्याच्या दृष्टीनें ते पहाणी करणार आहेत. कच्च्या फिलमच्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री पूर्व जर्मनीकडून मिळण्यांत अडचणी निर्माण झाल्या आहेत.

**ब्रिटन-रशिआ व्यापारी करार**—ब्रिटन व रशिआ ह्यांच्या दरम्यान एका नव्या व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. कराराच्या अंमलबजावणीस १ जुलै १९५९ पासून सुरवात होणार आहे. करारामुळें उभयपक्षीं करण्यांत येणाऱ्या व्यापारी देवाण-घेवाणींत बरीच वाढ होईल असा अंदाज व्यक्त करण्यांत येत आहे.

**हिंदी खाद्यपदार्थ लोकप्रिय**—जर्मनींतील म्युनिक ह्या शहरीं हिंदी खाद्यपदार्थांचें व प्रवासाविषयींचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रथम पदार्थ फार तिखट असल्याची कल्पना होऊन जर्मन लोक दूर राहिले. पण, नंतर हिंदी खाद्यपदार्थांची मागणी इतकी वाढली कीं त्यांचा पुरवठा अपुरा पडला.

**अमेरिकेंत स्थायिक होणारे परकीय**—अमेरिकेंत येऊन स्थायिक होऊं इच्छिणाऱ्या परदेशीय नागरिकांच्या बाबतींत नियम घालून देणारी पद्धत सुमारें ३२ वर्षांपासून अंमलांत आलेली आहे. ह्या प्रश्नासंबंधीं एक नवें बिल सिनेटर जॉन केनेडी हे आणणार आहेत. स्थायिक होऊं इच्छिणाऱ्या लोकांची संख्या दरसाल २॥ लाखांपर्यंत मर्यादित करण्यांत यावी अशी तरतूद बिलांत करण्यांत येणार आहे.

**आस्वान येथील धरणाचें काम**—आस्वान येथें बांधण्यांत यावयाच्या प्रचंड धरणासाठी वाटाघाटी करण्यास इजिप्तचे प्रतिनिधि मॉस्कोला गेले आहेत. ह्या धरणाचे रशियन नकाशे प्रे. नासर ह्यांच्याकडे विमानानें पाठविण्यांत येतील. धरणाच्या बांधकामासाठी रशियानें गेल्या वर्षी ३·५ कोटी पौंडांचें कर्ज देऊं केलेलें आहे. ह्या धरणासंबंधीं गेलीं २० वर्षे इजिप्तमध्यें चर्चा होत आहे.

**रशिआकडून पोलादाची आयात**—चालू वर्ष संपण्याच्या आधीं भारत रशिआकडून २ लाख टन पोलादाची आयात करणार आहे. त्याची किंमत सुमारें ९ कोटी रुपये होईल. १९५५ सालीं भारतानें रशिआशीं करार करून १० लाख टन पोलाद आयात करण्याचें ठरविलें होतें. त्यापैकीं हा शेवटचा हप्ता आहे. एक लाख टन पोलादाची किंमत ठरविण्यांत आली आहे. बाकीच्याची ठरवावयाची आहे.

**गरीब हौशी प्रवाशांची सोय**—कमी उत्पन्न असणाऱ्या गरीब हौशी प्रवाशांची उतरण्याची सोय करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकार आग्रा येथें एक निवासस्थान बांधणार आहे. निवासस्थानासाठी एक लाख रुपये खर्च येईल व तें सरकारतर्फे चालविण्यांत येईल. उतरणाऱ्या प्रवाशांची जेवणाची सोयहि तेथें करण्यांत येणार आहे. निवासस्थान राजा-की-मंडी भागांत बांधण्यांत येईल.

**नीरेपासून साखरेचें उत्पादन**—आंध्र प्रदेश सरकार नीरेपासून साखर तयार करण्याची यंत्रसामुग्री जपानकडून आयात करणार आहे. यंत्रसामुग्रीसाठी १·५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास ताड कामगारांना रोजगाराचें साधन उपलब्ध होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## " दि बॉम्बे को-ऑपरेटर "

### मासिक न्यूज बुलेटिनचें पाक्षिकांत रूपांतर

सहकारी चळवळीविषयीं माहिती पुरविणारें एक साप्ताहिक सुरू करण्यांत यावें, असें मुंबई राज्य सहकारी युनियनच्या गेल्या वार्षिक सभेंत सुचविण्यांत आलें. त्याला अनुसरून, पहिलें पाऊल म्हणून सध्यांच्या मासिक 'न्यूज बुलेटिन' चें 'दि बॉंबे को-ऑपरेटर' ह्या पाक्षिकांत रूपांतर करण्यांत आलें आहे. 'बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली' हें गेलीं ४२ वर्षे चालू असलेलें त्रैमासिक पूर्वीप्रमाणेंच चालू राहील. 'दि बॉंबे को-ऑपरेटर'चा पहिला अंक १६ मे रोजीं प्रसिद्ध झाला. ह्या पाक्षिकांत मुख्यतः सहकारी बातम्या देण्यांत आल्या तरी भाषणें, निवेदनें, चर्चा, ह्यांसहि त्यांत जागा मिळेल. पहिल्या अंकांत श्री. इंदिरा गांधी, राज्यपाल श्री. श्रीप्रकाश, अर्थमंत्रि श्री. मुरारजी देसाई व डॉ. जीवराज मेहता, इत्यादींचे संदेश देण्यांत आले आहेत.

---

### खुल्या विक्रीसाठी १,९०,००० टन साखर मोकळी केली

भारत सरकारनें खुल्या विक्रीसाठी १,९०,००० टन साखर मोकळी केली आहे. एप्रिल महिन्यांत खुल्या विक्रीसाठी मोकळ्या करण्यांत आलेल्या सांठ्यापेक्षा हा सांठा पुष्कळच मोठा आहे. उत्तर प्रदेश, उत्तर बिहार आणि पंजाब या विभागांतील साखर-कारखान्यांना, कारखान्याबाहेर विक्रीसाठी म्हणून भारत सरकारनें २२ डिसेंबर, १९५८ रोजीं ठरवून दिलेल्या विक्रीच्या दरापेक्षा अधिक दरानें या साखरेची विक्री करतां येणार नाहीं.

---

### रेल्वे-वहातुकीच्या विकासाचा अभ्यास

हिंद सारख्या खंडप्राय देशांत रेल्वे-वहातुकीला महत्त्वाचें स्थान आहे. रस्त्यानें होणारी वहातूक, नदीमार्गानें होणारी वहातूक व सागरी वहातूक हे पर्याय असले तरी भारताच्या सर्वच भागांत ते योग्य प्रमाणांत उपलब्ध नाहींत. शिवाय त्यांच्यांत सुसूत्रता आणण्याचें कामहि बिकट व कालावधी लागणारें आहे. त्यांत पुन्हां पंचवार्षिक योजनांच्या द्वारां जें औद्योगीकरण करण्यांत येत आहे त्यामुळें रेल्वेवरील वहातुकीचा ताण वाढला आहे व वाढत जाणार आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन मध्यवर्ति सरकारनें रेल्वेवाहतुकीच्या विकासाचें काम हातीं घेतलें. भारतामधील रेल्वेच्या विकासासाठी जागतिक बँकेनें पहिलें कर्ज १९४९ सालीं मंजूर केलें. कर्जाची रक्कम ३·२ कोटी डॉलर्स होती व तिचा उपयोग करून कॅनडांतून व अमेरिकेंतून रेल्वे एंजिनें आणण्यांत आलीं. १९५७ मध्यें जागतिक बँकेनें आणखी ९ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें. त्यानंतर आणखी वाटाघाटी होऊन १९५८ च्या सप्टेंबरमध्यें बँकेनें पुन्हां ८·५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें. ह्या कर्जाचा उपयोग १९५९ च्या मार्चपर्यंतचीं परदेशी देणीं देण्याकडे करण्यांत यावयाचा होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत बँकेनें जीं दोन कर्जे दिलीं त्यांचा पूर्णपणें उपयोग करून घेण्यांत आला. सध्यां बँकेचे दोन प्रतिनिधी भारताच्या दौऱ्यावर आहेत. हिंदमधील रेल्वे-वहातुकीचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठीं आणि तिनें केलेल्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी ते हिंडत आहेत. त्यांचा दौरा ४,५०० मैलांचा आहे. भारतामधील मोठालीं, रेल्वे वर्कशॉप्स, कारखाने इत्यादि महत्त्वाच्या बाबी ते नजरेखालून घालणार आहेत. त्यांचा अहवाल बँकेकडे गेल्यावर रेल्वे-वहातुकीच्या सुधारणांसाठी आणखी कर्जे मिळविण्याच्या वाटाघाटी सुरू होतील.

### खाजगी उद्योगधंद्यांना अमेरिकेची मदत

भारत सरकार आणि अमेरिकेचे टेक्निकल को-ऑपरेशन मिशन ह्यांच्यामध्यें दोन करार करण्यांत आले आहेत. करारा-प्रमाणें इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ आणि फायनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या संघटनांना प्रत्येक १० कोटी रुपये मिळावयाचे आहेत. पब्लिक लॉ ४८० अन्वयें जो निधि भारतांत जमा झाला आहे त्यांतून वरील रकमा देण्यांत येणार आहेत. ह्यामुळें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना मिळूं शकणाऱ्या आर्थिक मदतींत वरील संघटनांना वाढ करतां येईल. करारानंतर स्थानिक चलनाच्या स्वरूपांत अमेरिकेकडून मिळालेली मदत १५४ कोटी रुपयांच्या घरांत जाईल. इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ही संघटना १९५५ सालीं स्थापन करण्यांत आली. तिचें वसूल भांडवल ५ कोटी रुपयांचें होतें व तें अमेरिकन, हिंदी आणि ब्रिटिश कंपन्यांच्या मालकीचें होतें. भारतामधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांत परदेशी व हिंदी भांडवलाच्या गुंतवणुकीस उत्तेजन देण्याचें कार्य संघटना करीत असते. संघटनेला भारत सरकारकडून ७·५ कोटी रुपयांचें बिनाव्याज कर्ज देण्यांत आलें आहे. अमेरिकेनें भारताला जें पोलाद पुरविलें त्याच्या विक्रींतून ही रक्कम देण्यांत आली आहे. त्याशिवाय आंतरराष्ट्रीय बँकेकडून ५ कोटी रुपये देण्यांत आले आहेत. इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन १९४८ सालीं स्थापन करण्यांत आलें. हें कॉर्पोरेशनहि भारतामधील खाजगी मालकीच्या उद्योग-धंद्यांना मध्यम व लांब मुदतीचीं कर्जे पुरवीत असते. दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेच्या कालांत उद्योगधंद्यांना अशीं कर्जे पुरविण्या-साठी कॉर्पोरेशनला आणखी २० कोटी रुपयांची जरूरी लागेल.

---

### प्रे. आयसेन होअर ह्यांच्या खर्चावर टीका व चर्चा

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. आयसेन होअर ह्यांनीं सरकारच्या खर्चांत संयम राखण्यांत यावा असें मत अलीकडे व्यक्त केलें होतें. पण खुद्द त्यांच्यावर होणाऱ्या खर्चाच्या बाबतींतच अमेरिकन काँग्रेसमध्यें चर्चा होण्याचा रंग दिसूं लागला आहे. अमेरिकेचा अध्यक्ष राहतो त्या जागेला व्हाइट हाऊस असें म्हणतात. ह्या निवासस्थानावर व तेथील लवाजम्यावर होणाऱ्या खर्चाबद्दल मि. फ्रॅंक नोवालस्की नांवाच्या एका काँग्रेस सदस्यानें एक जाहीर पत्रक काढलें आहे. पत्रकांत अध्यक्षासाठी होणाऱ्या खर्चाच्या कांहीं बाबींबाबत आक्षेप घेण्यांत आले आहेत. त्यांच्या मतानें व्हाइट हाऊस येथें आचारी, शोफर्स व वेटर्स ह्यांचीं कामें करण्यासाठी लष्करांतील माणसें वापरलीं जातात आणि त्यामुळें दरसाल २॥ लाख डॉलर्स निष्कारण खर्च केले जातात. त्यांनीं असा अंदाज केला आहे कीं येत्या जुलैपासून सुरू होणाऱ्या वर्षांत अमेरिकन लोकांना अध्यक्षांसाठी ५४ लाख डॉलर्स खर्च करावे लागतील. हा खर्च ६ वर्षांपूर्वींच्या खर्चाशीं तुलना करतां दुप्पट अधिक आहे. ह्या रकमेंत अध्यक्षां-च्या पगाराचा व इतर खर्चाचा सालीना २ लाख डॉलर्सचा आंकडा धरलेला आहे. पण त्यांचे गुप्त शरीररक्षक आणि नवीन जेट विमान ह्यांच्यावरील खर्च धरलेला नाहीं. त्याशिवाय अध्यक्षांच्या दिमतीला मोटारगाड्यांचा एक ताफा, एक जल-विहाराची नौका, इत्यादि गोष्टी असतातच. अध्यक्षांच्या खर्चा-बद्दल काढण्यांत आलेल्या ह्या पत्रकामुळें बरीच खळबळ माजली असून वृत्तपत्रांत चर्चाहि होऊं लागली आहे. ह्या पत्रकाला उत्तर म्हणून अध्यक्ष आयसेन होअर सिनेटच्या कचेऱ्यांसाठी बांधण्यांत आलेल्या नव्या भव्य इमारतीकडे बोट दाखविण्याचा संभव आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ३ जून, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद् काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## अमेरिकेंतील मंदीचे जगावर परिणाम

अमेरिकेला शिंक आली म्हणजे बाकीचें जग थंडीनें कुडकुडतें, अशा आशयाची एक म्हण अर्थशास्त्रज्ञांत प्रचलित आहे. गेल्या महायुद्धानंतर अमेरिकेंत तेजीमंदीच्या ज्या लाटा आल्या त्यांचा अभ्यास करणारा एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. अमेरिका आणि जगांतील अविकसित देश ह्या दोघांच्याहि दृष्टीनें अहवालांतील माहिती उद्बोधक आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, युद्धोत्तर कालांतील मंदीमुळें खुद्द अमेरिकेचें ४,००० कोटी डॉलर्सचें नुकसान झालें असून जगांतील अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थेवर बराच विपरीत परिणाम झाल्याचें दिसून येतें. ब्रिटनमध्यें औद्योगिक उत्पादन १९५५ सालापासून फारसें वाढलेलें नाहीं. १९५५ ते १९५७ ह्या कालांत जगांतील व्यापारांत पुन्हां तेजी आली हें खरें; पण ह्या तेजीचें प्रमाण फारसें व्यापक नव्हतें. १९५७–५८ सालीं प्राथमिक स्वरूपाच्या कच्च्या मालाच्या किंमती उतरल्या व त्याचवेळीं औद्योगिक मालाच्या किंमती वाढल्यामुळें हा माल निर्माण करणाऱ्या देशांना २०० कोटी डॉलर्सचें नुकसान सोसावें लागलें. जागतिक व्यापाराच्या मामुली व्यवहारांत थोडी जरी चलबिचल झाली तरी अविकसित देशांच्या आर्थिक स्थितीवर किती वाईट परिणाम होतो तें ह्यावरून पुन्हां एकदां दिसून आलें. १९५७ च्या मध्यापासून १९५८ च्या मध्यापर्यंत अविकसित देशांच्या निर्यात व्यापाराच्या प्राप्तींत ७ ते ८ टक्क्यांची घट झाली. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक तज्ज्ञांचें असें मत आहे कीं, अमेरिकेंत ह्यापुढें येणाऱ्या मंदीच्या लाटा अल्पकाल टिकणाऱ्या असतील असें मानण्यास पुरेसा पुरावा नाहीं. १९३० सालच्या दीर्घकालीन व तीव्र स्वरूपाच्या मंदी आतां येणार नाहीं तरी आर्थिक स्थैर्य राखण्याच्या नेहमींच्या उपायांनीं मंदी टाळतां येणार नाहीं, हेंहि खरें आहे.

## युद्धांतील नुकसानभरपाईपायीं जबर किंमत

गेल्या महायुद्धांत जपाननें ज्या देशांवर आक्रमण केलें त्या देशांना जपानला जबर नुकसानभरपाई द्यावी लागत आहे. पण त्याचबरोबर ह्या मार्गानें त्या देशांचा औद्योगिक विकासहि साधण्यांत येत आहे. ह्यासंबंधीं असा अंदाज करण्यांत आला आहे कीं येत्या १७ वर्षांच्या कालांत जपानला ७५० कोटी रुपये नुकसानभरपाईदाखल व आर्थिक साह्यादाखल द्यावे लागतील. आग्नेय आशिआंतील देशांना जपानी बोटींतून नाना प्रकारचा भांडवली माल पुरविण्यांत येत आहे. ह्या देशांतून जपाननें सिमेंटचे कारखाने, कागदाच्या गिरण्या बांधल्या आहेत. ब्रह्मदेशांतील जंगलांतून जपानी बनावटीच्या ट्रक्स धावत आहेत. त्याशिवाय विजेची यंत्रसामुग्री, रेल्वेचें सामान, डिझेल एंजिनें, इत्यादि मालहि जपान पुरवीत आहे. नुकसानभरपाईचा व आर्थिक साह्याचा अशा प्रकारचा शेवटचा करार जपाननें इंडोचायनाशीं केला आहे. कराराप्रमाणें नुकसानभरपाईदाखल १९ कोटी रुपये व कर्ज म्हणून ८ कोटी रुपये देण्यांत येणार आहेत. अशाच प्रकारचे करार जपाननें फिलिपाइन्स, ब्रह्मदेश आणि इंडोनेशिआ ह्या देशांशीं केले आहेत. भारत, कांबोडिआ, लाओस, ह्या देशांनीं नुकसानभरपाईचा आपला हक्क सोडून दिला आहे. या सर्व करारामुळें जपानवर फार मोठा आर्थिक भार पडलेला आहे. येत्या दहा वर्षांत दरसाल किमान ४७ कोटी रुपयांचा माल अगर आर्थिक सोयी–सवलती जपानला परदेशीं पाठवाव्या लागतील. त्यानंतरहि आणखी ७ वर्षें जरा कमी प्रमाणांत असेंच साह्य द्यावें लागेल. ह्या जबाबदाऱ्या जपान पाळत आहे आणि त्याशिवाय आणखी लक्षावधि रुपयांच्या रकमा आशिआंत गुंतवीत आहे.

## तेलवहातुकीच्या नळासाठीं जर्मन कारखान्याची मदत

भारतांत ठिकठिकाणीं खनिज तेलाच्या शोधाचें काम चालू आहे. ज्या ठिकाणीं हें तेल भरपूर प्रमाणांत सांपडेल तेथून तें वाहून नेण्याची व्यवस्था करावी लागेल. तेलाची वहातूक नळांच्या साह्यानें करणें सुलभ असलें तरी त्यासाठीं लागणारे नळ भारतांत तयार होत नाहींत. म्हणून भारत सरकारनें रूरकेला येथें अशा प्रकारचे नळ तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे आणि त्यासाठीं एका प. जर्मन कारखान्याचें साह्य घेण्याचें मुक्रर केलें आहे. कारखान्याकडून भारताला आर्थिक व तांत्रिक अशा दोन्ही प्रकारची मदत मिळणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ४ कोटी रुपयांचें भांडवल लागणार असून त्यापैकीं परदेशीय चलनांतील सर्व खर्च जर्मन फर्म करणार आहे. कारखान्याची उभारणी होऊन प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यास एक वर्ष लागणार आहे. आसाममधील खनिज तेल गोहाटी व बरौनी ह्या ठिकाणीं शुद्ध करण्यांत येणार आहे. ह्या दोन्ही ठिकाणीं उभारण्यांत येणाऱ्या कारखान्यांना नळाच्या साह्यानें अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्यांत येणार आहे. आसाममधून गोहाटीच्या कारखान्यापर्यंत व तेथून पुढें बरौनीच्या कारखान्यापर्यंत तेलाची वहातूक करण्यासाठीं ७५० मैल लांबीचे नळ टाकावे लागतील. रूरकेला येथें उभारण्यांत येणाऱ्या तेलनळाच्या कारखान्यांत इतक्या लांबीचे नळ इतक्या थोड्या अवधींत तयार होणें अशक्यच आहे आणि तेलाच्या वहातुकीची सोय झाल्याखेरीज तेलशुद्धीचे कारखाने सुरू होणार नाहींत. म्हणून वहातुकीच्या नळापैकीं बरेच नळ परदेशांतून आयात करावे लागणार आहेत. बर्मा ऑइल कंपनीनें तेलाचे नळ टाकण्याचें काम अंगावर घेतलेलें आहे. कंपनीच्या उपकंपन्या जरूर तें यंत्रसाहित्य पुरवितील अशी अपेक्षा आहे.

**केरळांत टायर्सचा कारखाना**—केरळचें सरकार मुंबईमधील एका कारखान्याशीं राज्यांत टायर्स तयार करण्याचा कारखाना काढण्याविषयीं वाटाघाटी करीत आहे. वाटाघाटी यशस्वी झाल्यास एका जर्मन अगर अमेरिकन कंपनीच्या सहकार्यानें कारखाना उभारण्यांत येईल. त्यासाठीं जरूर त्या सवलती देण्यास सरकार तयार आहे.

# BANK OF

## BALANCE SHEET AS

| 1957 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 50,00,000 | 50,000 shares of Rs. 100/- each ... | 50,00,000—00 | |
| | *Issued Capital:* | | |
| 25,00,000 | 25,000 shares of Rs. 100/- each. ... | 25,00,000—00 | |
| | *Subscribed Capital:* | | |
| 25,00,000 | 25,000 shares of Rs. 100/- each. ... | 25,00,000—00 | |
| 12,50,000 | Amount called up at Rs. 50/- per Share. ... | 12,50,000—00 | |
| | Less Calls Unpaid. ... | Nil | |
| | Add Forfeited Shares. ... | Nil | 12,50,000—00 |
| 34,500 | **2. Reserve Fund and Other Reserves** ... | | 34,500—00 |
| | **3. Deposits and Other Accounts** | | |
| 4,17,638 | Fixed Deposits ... | 4,56,819—66 | |
| 6,79,870 | Savings Bank Deposits ... | 6,25,714—60 | |
| 4,65,373 | Current Accounts and Contingency Accounts etc. ... | 4,35,891—86 | |
| 15,62,881 | | | 15,18,426—12 |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| Nil | (1) In India ... | Nil | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | |
| | Particulars | | |
| Nil | (1) Secured ... | Nil | |
| Nil | (2) Unsecured ... | Nil | Nil |
| Nil | **5. Bills Payable** ... | | Nil |
| | **6. Bills for Collection, being Bills Receivable as per Contra:** | | |
| 84,553 | (1) Payable in India ... | 55,624—69 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | 55,624—69 |
| 84,553 | | | |
| | **7. Other Liabilities** | | |
| Nil | (1) Provision for Income tax ... | 704—30 | |
| 109 | (2) Outstanding Liabilities for Expenses. ... | 1,045—00 | |
| 1,000 | (3) Staff Security Deposit ... | Nil | |
| 253 | (4) Income Received in Advance ... | 124—02 | 1,873—32 |
| 1,362 | | | |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and other obligations as per Contra:** | | Nil |
| 29,33,296 | Carried Over Rs. ... | | 28,60,424—13 |

# POONA LIMITED.

**AT 31st DECEMBER, 1958**

| 1957 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 2,80,770 | In hand and with Reserve Bank and State Bank (Including foreign currency notes) ... | | 2,81,012—28 |
| | **2. Balances with Other Banks** (On Current Accounts) | | |
| 1,59,484 | (1) In India ... | 1,61,297—93 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | 1,61,297—93 |
| Nil | **3. Money at Call and Short Notice** ... | | Nil |
| | **4. Investments (At Book value)** ... | | |
| 5,99,202 | (1) Securities of the Central and State Governments and other trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments of the face value of Rs. 6,01,300/- (Market Valu Rs. 5,77,840—70) ... | 5,99,202—25 | |
| 6,069 | (2) Shares: Ordinary fully paid (Market Value Rs. 2,703—78. Shares of the book value of Rs. 290-28 are not quoted on the stock exchange). ... | 6,069—53 | |
| Nil | (1) Partly paid ... | Nil | |
| Nil | (2) Deferred full paid ... | Nil | |
| Nil | (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (4) Other Investments ... | Nil | |
| Nil | (5) Gold ... | Nil | 6,05,271—78 |
| 6,05,271 | (Govt. Securities of the face value of Rs. 6,00,000/- are lodged with other Banks for advance facilities) | | |
| | **5. Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors subject to particulars under clause (4) below) | | |
| | (1) Loans, Cash Credits and Overdrafts. | | |
| 16,08,306 | (1) In India ... | 15,25,782—80 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | |
| | (2) Bills Discounted and Purchased (excluding treasury bills of the Central and State Governments) | | |
| 5,357 | (1) Payable in India ... | 8,110—70 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | 15,33,893—50 |
| 16,13,663 | | | |
| | **Particulars of Advances** | | |
| 10,37,616 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 9,95,296—16 | |
| 2,35,661 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security. ... | 2,10,109—92 | |
| Nil | (3) Debts considered good secured by personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors ... | Nil | |
| 3,40,386 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for | 3,28,487—42 | |
| 16,13,663 | | 15,33,893—50 | |
| 45,040 | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 47,794—26 | |
| Nil | (6) Debts due by Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies, as members. ... | Nil | |
| 46,688 | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 47,794—26 | |
| 26,59,188 | Carried over Rs. ... | | 25,81,475—49 |

# BANK OF

## BALANCE SHEET AS

| 1957 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 29,33,296 | Brought forward ... | | 28,60,424—13 |
| Nil | **10. Contingent Liabilities** ... | | Nil |
| 29,33,296 | Total Rs. ... | | 28,60,424—13 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31st DECEMBER, 1958.

| 1957 | EXPENDITURE | | Rs. nP. | 1957 | INCOME (Less provisions made during for the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | Rs. nP. |
|---|---|---|---|---|---|---|
| 32,244 | To Interest paid on Deposits, Borrowings, etc. ... | | 36,936—97 | 53,267 | By Interest and Discount. ... | 54,382—17 |
| | „ Salaries and Allowances and Provident Fund | | | 3,835 | „ Commission, Exchange and Brokerage. ... | 2,812—32 |
| 6980 | (1) Manager | 6,980—00 | | | | |
| 31,837 | (2) Staff | 26,709—11 | 33,638—11 | Nil | „ Rents ... | Nil |
| 38,817 | | | | | | |
| Nil | „ Directors' and Local Committee Members' Fees and allowances ... | | Nil | | „ Net Profit on sale of investments, gold and silver, land, premises and other assets (not credited to reserves or any particular fund or account). ... | |
| 5,979 | „ Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 6,248—33 | | | |
| 1799 | „ Law Charges. ... | | 1,727—96 | Nil | | Nil |
| 2,919 | „ Postage, Telegrams and Stamps ... | | 3,399—11 | | „ Net Profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserves or any particular fund or Account) ... | |
| 1,000 | „ Auditors' Fees ... | | 1,000—00 | | | |
| 2,032 | „ Depreciation on and repairs to the Banking Company's Property. ... | | 1,794—00 | Nil | | Nil |
| 3,513 | „ Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 2,952—60 | | | |
| Nil | „ Loss from sale of or dealing with Non-Banking assets. ... | | Nil | | „ Income from Non-Banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | |
| | „ Other Expenditure. ... | | | 300 | | 12—25 |
| | „ Income Tax for the years ended 31-12-54. | 704—30 | | 2,763 | „ Other receipts. ... | 1,546—83 |
| 5,375 | „ Other Expenditure | 4,026—38 | 4,730—68 | 33,513 | „ Net loss for the year. ... | 33,724—89 |
| 93,678 | Total Rs. ... | | 92,478—46 | 93,678 | Total Rs. ... | 92,478—46 |

As per our certificate at the foot of the annexed Balance Sheet.

D. K. Naik *Chairman.*

P. G. Bhagwat
Chartered Accountants.
Poona 22-3-1959.

N. B. Parulekar
F. P. Pocha
G. K. Naik
*Directors*

G. G. Sathe
*Manager*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE HOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of Bank of Poona Limited, as at 31st December, 1958 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the audited returns of all Branches of the Bank.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227 (5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are therefore drawn up in conformity with forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that:
(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory;
(b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank;
(c) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the Bank;

# POONA LIMITED.

**AT 31st DECEMBER, 1958**

| 1957 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 26,59,188 | Brought over ... | | 25,81,475—49 |
| 60,306 | (8) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of the private companies, as Members ... | Nil | |
| Nil | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, being Bills for Collection** as per contra. | | |
| 84,553 | (1) Payable in India ... | 55,624—69 | 55,624—69 |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations as per Contra :** ... | | Nil |
| Nil | **8. Premises Less Depreciation** | | Nil |
| | **9. Furniture and Fixtures Less Depreciation** | | |
| | At Cost as per last Balance Sheet ... | 50,798—42 | |
| | Additions during the year ... | Nil | |
| | Less Sales ... | 20—00 | |
| | | 50,778—42 | |
| | Less Depreciation upto 31-12-1957 22,049—42 | | |
| 28,749 | For the year 1,729—00 | 23,778—42 | 27,000—00 |
| | **10. Other Assets including Silver** | | |
| 1,000 | (1) Staff Security Deposit ... | Nil | |
| 19,000 | (2) Land at Cost. ... | 19,000—00 | |
| | (3) Vehicle ( Depreciated cost ) 325—00 | | |
| 325 | Less depreciation for the year 1958 65—00 | 260—00 | |
| 1,295 | (4) Stationery Stock ... | 795—00 | |
| 113 | (5) Stamps ... | 116—47 | |
| 5,692 | (6) Interest accrued on Investment ... | 5,675—23 | |
| 16,980 | (7) Tax deducted at source ... | 21,979—22 | |
| 506 | (8) Prepaid Expenses ... | 510—75 | |
| 332 | (9) Income due but not received ... | 28—00 | |
| 9,765 | (10) Advances for expenses to Pleader ... | 9,253—62 | |
| 1,878 | (11) Branch Adjustment ... | 1,061—13 | 58,679—42 |
| 56,886 | | | |
| 31,720 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | 31,720—25 |
| | **12. Profit and Loss Account** | | |
| 38,686 | Balance of Loss of Last year ... | 72,199—39 | |
| 33,514 | Add Balance of Loss this year. ... | 33,724—89 | 1,05,924—28 |
| 72 200 | | | |
| 29,33,296 | Total Rs. ... | | 28,60,424—13 |

D. R. Naik *Chairman.*

N. B. Parulekar }
F. P. Pocha } *Directors*
G. K. Naik }

G. G. Sathe
*Manager.*

(d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns.

(e) In our opinion, and to the best of our information, and according to the explanations given to us the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies, and on such basis the said Balance Sheet, read along with the notes appearing thereon, gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1958, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the loss for year ended upon that date.

Poona, 22nd March, 1959.

P. G. BHAGWAT
Chartered Accountants.

# Bank of Poona Limited.

***Thirteenth Report***

Thirteenth Report of the Board of Directors to be submitted to the Shareholders at the Thirteenth Ordinary General Meeting to be held at the Registered Office of the Bank. 455, Raviwar Peth Poona City, on Thursday the 25th June 1959 at 11 a. m.

The Directors beg to submit to the Shareholders the Balance Sheet as at and Profit and Loss Account for the year ended 31st December 1958, of the Bank duly certified by the Auditors.

INCOME–During the year under report the gross earnings of the Bank amounted to Rs. 58,753–57 nP. as against Rs. 60,165–41 last year. The fall in the income is under heads interest commission, exchange and other receipts. As pointed out in our last year's report interest has not been charged on advances where the advance is under recovery through court procedure. Further there is a fall in the figure of advances by about Rs. 80,000/– than that of the previous year. This has also affected the earnings of the Bank.

EXPENDITURE–As for the expenditure the total expenses including interest paid on deposits and borrowing, establishment eharges, law and other charges amounted to Rs. 92,478–46 as against Rs. 93,678–93 for the previous year.

In terms of article No. 118 of the Bank, Shri G. K. Naik, B. Sc., B. E., LL. B., retires by rotation, but being eligible offers himself for re-election.

The Shareholders are requested to appoint Auditors and to fix their remuneration.

The present Auditors M/S P. G. Bhagwat are eligible for re-election.

The Directors thank the Shareholders, Customers, Constituents and the Staff of the Bank for their help and co-operation.

Poona City.
22nd March, 1959.

D. R. Naik Chairman.
N. B. Parulekar
F. P. Pocha
G. K. Naik
} Directors.

G. G. Sathe,
Manager.

---

**BANK OF POONA LIMITED.**

DIRECTORS' REPORT

and

STATEMENT OF ACCOUNTS

for the

Year ended 31st December 1958

NOTICE is hereby given that the Thirteenth Annual Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Poona Limited will be held at the Registered Office of the Bank, 455 Raviwar Peth, Poona City, on Thursday the 25th June 1959 at 11. a. m. (Standard Time) to receive the Report of the Directors and the Audited Accounts for the year ended 31st December 1958, to elect a Director in place of one retiring by rotation and to appoint Auditors and fix their remuneration.

By Order of the Board.

Poona City,
22-3-59

G. G. SATHE,
Manager.

N. B. The Transfer Books of the Bank will be closed from 18th June to 2nd July 1959 both days inclusive.

Please note that a member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote, instead of himself and a proxy need not be a member of the Bank.

**जर्मनीकडून अधिक मदत**—भारत व पश्चिम जर्मनी ह्यांच्यांतील आर्थिक देवाण-घेवाण वाढविण्याच्या हेतूनें पश्चिम जर्मनींत एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. भारतामधील मालाला जर्मनींत बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीनें त्याचा उपयोग होईल; भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला अधिक मदत मिळण्याच्या दृष्टीनेंहि त्याचा फायदा होईल.

**ऑस्ट्रेलिआंत शीतज्वराची साथ**— ऑस्ट्रेलिआंतील बहुतेक उपराज्यांतून शीतज्वराच्या साथीनें मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घातला आहे. कित्येक शहरांतील अर्धीअधिक लोकसंख्या ह्या तापानें पछाडली गेली असल्यानें कचेऱ्यांतील व कारखान्यांतील कामावर बराच परिणाम झाला आहे. डॉक्टरांच्या मतानें साथीचा जोर अद्याप पूर्ण झालेला नाहीं.

**केरळमधील दारूबंदी**—केरळ राज्य सरकारच्या आंकडेशास्त्रीय खात्यानें राज्यांतील दारूबंदीच्या परिणामांचा व यशापयशाचा आढावा घेण्याच्या दृष्टीनें पहाणी केली आहे. हा अहवाल प्राथमिक स्वरूपाचा असल्यानें त्याबद्दलची माहिती सरकारनें दिली नाहीं पहाणीचा अहवाल नियोजन समितीकडे पाठविण्यांत आला आहे.

**काश्मीरमधील पाटबंधाऱ्यांचें काम**—काश्मीर सरकारनें जम्मू प्रांतांत शेतीला पाणीपुरवठा करणारी पाटबंधाऱ्यांची योजना हातीं घेतली आहे. रावी नदीला कालवे काढण्याची ही योजना आहे. काश्मीरची हद्द संपल्यावर पुढील कालव्याचें काम पंजाब सरकार करणार आहे. योजनेसाठी ८ लाख रुपये खर्च येईल व तीमुळें २८,००० एकर जमिनीस पाणी मिळेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.